# बिइंग वुमन

*Pune's only Fortnightly for Women*

किंमत ₹ ५/- पृष्ठसंख्या ४ | पुणे - वर्ष १, अंक ५ - १५ ते ३१ जानेवारी २०२० (पाक्षिक)







## Shinnian Kuaila




सौ. स्नेहल देशपांडे देशमुख
response.beingwoman@gmail.com


चिनी लोकांचा सर्वात मोठा आणि महत्त्वाचा सण म्हणजे चिनी नववर्ष (Chinese New Year) त्याला CNY असं संबोधितात. जसं भारतात आपण दिवाळी हा सण सर्वात उत्साहाने साजरा करतो. तसेच चिनी लोक नववर्ष साजरे करतात. यावर्षी चिनी नववर्ष हे २५ जानेवारीला आहे. मागच्या वर्षी आम्ही या नववर्षाच्या दरम्यान आलो होतो तर माझ्या नवऱ्याच्या युनिव्हर्सिटी मध्ये एकदम शुकशुकाट! कुणीच दिसेना! आम्हाला वाटलं इतकी मोठी युनिव्हर्सिटी आणि कोणी विद्यार्थी नाहीत?

पण मग नवरा जॉईन झाल्यावर कळलं की त्यांना नववर्षाच्या सुट्ट्या लागल्या आहेत म्हणून सगळे आपापल्या घरी परत गेलेत. आम्हाला हे खूप नवीन होत. असं म्हणता येईल की शांघायला आल्यावर आम्हाला हा पहिला कल्चरल शॉकच होता. आता तुम्ही म्हणाल सुट्ट्या होत्या त्यात काय विशेष? अहो पण सुट्या फक्त विद्यार्थ्यांनाच नव्हत्या तर सगळ्यांनाच होत्या. दुकाने बंद, भाजी बाजार बंद, कुरिअर सेवा बंद, इंडियन स्टोअर बंद, आम्ही ज्या व्यक्तीकडून पाणी मागवतो तो पण जातो सुट्टीवर! सर्व कामगारांना, युनिव्हर्सिटीला महिनाभर सुट्टी असते आणि हा जो बाकीचा कामगार वर्ग आहे यांना किमान १० दिवस तरी नक्की सुट्टी असते. फक्त मॉल्स आणि मोठे सुपरमार्केटस् उघडे असतात. म्हणजे आम्हाला १० दिवस लागणाऱ्या वस्तू आधीच घेऊन ठेवाव्या लागतात.

तर हे सगळं का? याचं उत्तर म्हणजे जसं मी म्हणाले हा सण फार मोठा असतो. या सणाला सगळे आपल्या मूळगावी जाऊन आपल्या परिवारासोबत साजरा करतात. इथे ही प्रथाच आहे. या दरम्यान तिकिटं खूप महाग होतात सर्वत्र गर्दी असते पण तरीही कितीही महाग असो, कितीही खर्च होवो, कशाही परिस्थितीत पण आपल्या घरी जायचं आहे ही भावना असते त्यामुळे ही प्रथा कुणी मोडत नाही. असं म्हणतात की जगातील सर्वात जास्त स्थलांतर होतं ते या CNY ला! जसं आपण दिवाळीला आपल्या घरी जातो नि साजरी करतो तसंच! पण फरक इतकाच आपल्याकडे फक्त शाळा कॉलेजेसला इतकी सुट्टी असते आणि बाकी लोकांना एक दोन दिवसाचीच सुट्टी असते.

हे तर झालं सुट्ट्यांबद्दल.. आता बघुया काय आहे चिनी नववर्ष? चीन मध्ये तसे बरेच फेस्टीवलस् साजरे केले जातात. एक तर हे मुख्य CNY, लॅन्टर्न फेस्टिवल, मिड-ऑटम फेस्टिवल, ड्रॅगन बोट फेस्टिवल, क्विंगमिंग फेस्टिवल, नॅशनल डे वगैरे. भारतासारखंच चिनी लोक लूनार कॅलेंडर वापरतात. त्यामुळे त्यानुसार नवीन वर्षाच्या पहिल्या अमावास्येच्या दिवशी म्हणजेच न्यू-मूनला चिनी नववर्ष असतं. हे १५ दिवस चालतं. म्हणजेच १५ दिवसानंतरच्याच पौर्णिमेला लॅन्टर्न फेस्टिवल साजरा करतात. जसे आपल्याकडे १२ राशी आहेत, तसं चीनमध्ये प्रत्येक वर्ष एका प्राण्याला संबोधलं जातं. असे १२ प्राणी आहेत. जसं की मागचं वर्ष इयर ऑफ पिग होतं. हे वर्ष इयर ऑफ रॅट आहे. याचा अर्थ असा की जर तुमचा जन्म या वर्षांत झाला तर तुम्हाला ज्यावर्षी इयर ऑफ रॅट असेल ते वर्ष लकी असेल. आपल्या राशीनुसार जसं आहे तसेच. चीनमध्ये लाल रंगाला विशेष महत्त्व आहे. त्यामुळे इथे लाल रंगाचे लॅन्टर्न्सनी सगळीकडे सजावट केली जाते. अगदी सगळ्या रस्त्यांच्या बाजूला, दुकानात, घरांमध्ये, घराबाहेर, दरवाज्यावर खूप सुंदर सजावट करून, लाल पताके, तोरणं लावून सजवतात. लाल दिव्यांचा खूप वापर करतात. जसे आपण दिवाळीला



घर साफ करून, दिव्यांच्या माळा लावून सजवतो अगदी तसाच. पण आपल्याकडे पणतीचं महत्व आहे तर इथे विजेच्या दिव्यांचे. तसं तर शांघायला आल्यावर लक्षात आलं की इथे वर्षभरच लाल दिवे, लॅन्टर्न्स आणि रोषणाई केलेली असते. त्यामुळे शांघाय नेहमी चमकतंच असते. नववर्षाची एक विशेष गोष्ट म्हणजे रेड पॅकेट. चिनी नववर्षात एकमेकांना लाल पाकीटामध्ये पैसे घालून द्यायची पद्धत आहे. जसा आपल्याकडे पोळ्याला बोजारा देतात तसा प्रकार. विशेष म्हणजे इथे जे ऑनलाईन पेमेंट करतात त्यातसुद्धा रेड पाकीटाचा ऑप्शन येतो. कुणाला गिफ्ट करायचं असल्यास हे रेड पाकीट ऑनलाइन पाठवू शकतात. या दिवसात नवनवीन मांसाहारी पदार्थ, विशेषत: चिकनला जास्त महत्त्व आहे. त्याचा समावेश जेवणात हवाच असे म्हणतात. या सणाला सासरी गेलेल्या मुली माहेरी जातात. वर्षभर मग जाणं नाही होत आणि लग्नानंतर मुली परक्या होतात हे पण आपल्या सारखंच आहे. सर्व कुटुंबीयांसमवेत टीव्ही बघत जेवणाचा आस्वाद घेत हा सण साजरा होतो.

नववर्षाचे मुख्य आकर्षण म्हणजे शांघाय मध्ये YuYuan गार्डनमध्ये लॅन्टर्न फेस्टिवलचं आयोजन करतात. लॅन्टर्न्सचा उपयोग करून खूप सुंदर देखावे तयार करतात. मागच्या वर्षी इयर ऑफ पिग होतं तर भलेमोठे पिगचे देखावे केले होते. आम्ही तर ते सगळं बघून भारावून गेलो होतो. तो देखावा होताच इतका आकर्षक की काय सांगू! तसाच यावर्षी इयर ऑफ रॅट आहे तर रॅटचे देखावे केले आहेत, अप्रतिम आहेत. शांघाय मधील स्क़ायस्क्रेपर्सचे देखावे पण तयार केले जातात. विशेष करून लहान मुलांना खूप आवडतं हे सगळं बघायला. हे फेस्टिवल साधारण महिनाभर असतं. हे बघायला खूप दुरून लोक येतात. प्रचंड गर्दी असते. पण त्या गर्दीमध्ये सुद्धा चिनी लोक शिस्तीत रांग करून राहतात. जेणेकरून चेंगराचेंगरी होऊ नये. तसे पोलीस असतातच पण तरीही या लोकांना स्वतःहून शिस्तीत रहायची सवय आहे. त्यामुळे त्रास होत नाही आणि तो देखावा आणि एकंदरीत सगळा सोहळा बघून मन प्रसन्न होऊन जातं!

Shinnian kuaila! म्हणजेच चीनी नववर्षाच्या शुभेच्छा!

**- क्रमश:**

## Service Before Self




अनुराधा यादवाडकर
response.beingwoman@gmail.com


मागील भागात आपण भारतीय सैन्य दलाची तोंडओळख करून घेतली. आता आपण याची रचना कशी असते बघुया.

लष्कराची रचना एखाद्या पिरॅमिड सारखी असते. सर्वात वरचे टोक म्हणजे लष्कराचे मुख्यालय, जे दिल्लीत आहे. तर सर्वात खालील पाया हा सैनिक आहे. आपण या पिरॅमिडच्या पायापासून सुरुवात करूया.

भारतीय लष्कराच्या विविध रेजिमेंट्स आहेत. या रेजिमेंटच्या अनेक तुकड्या आहेत. या तुकडीला 'बटालियन' असे संबोधित करण्यात येते. सर्वात आधी बटालियनची रचना पाहूया. साधारणपणे दहा सैनिकांची एक तुकडी बनते जिला 'सेक्शन' असे म्हटले जाते. हवालदार दर्जाचा अधिकारी याचा प्रमुख असतो. असे तीन सेक्शन मिळून एक 'प्लॅटून' बनते.

एका प्लॅटूनमध्ये तीस सैनिक अधिक तीन हवालदार व प्लॅटून कमांडर असे मिळून ३४ ते ३५ जण असतात. या प्लॅटूनमध्ये 'घातक' तसेच 'एटीजीएम' (अँटी टँक गायडेड मिसाईल) अशी महत्वाची प्लॅटून्स असतात. प्लॅटूनचा प्रमुख लेफ्टनंट किंवा कॅप्टन दर्जाचा अधिकारी असतो.असे तीन प्लॅटून मिळून एक कंपनी तयार होते.

प्रत्येक बटालियन मध्ये तीन ते पाच कंपन्या असतात, क्वचित सहा देखील असतात. गरजेनुसार कंपनींची संख्या कमी किंवा जास्त केली जाते आणि हा अधिकार बटालियन प्रमुख म्हणजे कमांडिंग ऑफिसर (CO) यांना असतो. ते कर्नल दर्जाचे अधिकारी असतात. या कंपनीज अल्फा, ब्राव्हो, चार्ली, डेल्टा व हेडक्वॉर्टर कंपनी अशा नावाने ओळखल्या जातात. प्रत्येक कंपनीत १२० सैनिक व अधिकारी मिळून १३० ते १३५ जण असतात. कंपनी कमांडर हा मेजर दर्जाचा अधिकारी असतो. काही वेळेस लेफ्टनंट कर्नल दर्जाचा अधिकारी हे काम पहात असतो. थोडक्यात एका बटालियनमधील सैनिकांची संख्या साडेसातशे ते आठशे असते. काही वेळेस जरुरीनुसार ती हजार इतकी वाढवता येते. अशा तीन बटालियन मिळून एक ब्रिगेड तयार होते.



प्रत्येक ब्रिगेडमध्ये तीन हजार सैनिक असतातच, शिवाय सपोर्ट स्टाफ देखील असतो. ब्रिगेडचे प्रमुख ब्रिगेडियर दर्जाचे अधिकारी असतात. लष्करात वेगवेगळ्या प्रकारची ब्रिगेड्स कार्यरत आहेत. जसे डोंगरी ब्रिगेड म्हणजेच माऊंटन ब्रिगेड, आर्मर्ड ब्रिगेड, आर्टिलरी ब्रिगेड, पॅराशूट ब्रिगेड, एअरडिफेन्स ब्रिगेड इंजिनिअर्स ब्रिगेड, इंफॅन्टरी ब्रिगेड अशा स्वतंत्र ब्रिगेड्स कोअरच्या अखत्यारीत काम करत असतात. तीन किंवा चार पायदळाच्या ब्रिगेड्स म्हणजेच इंफॅन्टरी ब्रिगेड्स मिळून एक डिव्हिजन बनते.

डिव्हिजनचे प्रमुख हे मेजर जनरल दर्जाचे अधिकारी असतात. यांना जनरल ऑफिसर कमांडींग (GOC) म्हणून ओळखले जाते. भारतीय सैन्यात सध्या चाळीस डिव्हिजन्स कार्यरत आहेत. यात ४ रॅपिड डिव्हिजन, १८ इंफॅन्टरी डिव्हिजन, ३ आर्मर्ड डिव्हिजन, १० माऊंटन डिव्हिजन्स,२ आर्टिलरी डिव्हिजन्स, तसेच इतर डिव्हिजन यांचा समावेश आहे. तीन ते चार इंफॅन्टरी डिव्हिजन्स मिळून एक कोअर तयार होते.

कोअर प्रमुखास GOC म्हटले जाते व ते लेफ्टनंट जनरल दर्जाचे अधिकारी असतात. कोअर देखील वेगवेगळ्या प्रकारची आहेत, जसे आर्मी मेडिकल कोअर (-MC), आर्मी डेंटल कोअर (-DC) आर्मी सर्व्हिस कोअर (-SC), स्ट्राईक कोअर इत्यादी. पुढील लेखात या विषयी विस्तारपूर्वक जाणून घेऊया. असे ३ ते ४ कोअर मिळून कमांड बनते.

भारतीय लष्करात एकूण ७ कमांडस् आहेत. ईस्टर्न कमांड, वेस्टर्न कमांड, सदर्न कमांड, नॉर्दन कमांड, सेंट्रल कमांड, साऊथ वेस्टर्न कमांड व ट्रेनिंग कमांड हे सैन्यदलाची धुरा सांभाळत असतात. कमांडच्या प्रमुखास चीफ ऑफ स्टाफ (COS) म्हटले जाते व ते लेफ्टनंट जनरल दर्जाचे अधिकारी असतात.

पुढील भागात या सर्वांविषयी अधिक सविस्तरपणे जाणून घेऊया.




RNI TC No. MAHMAR49779



## संपादकीय

राधिका गिरीश परांजपे
editorial.beingwoman@gmail.com

आपल्या देशात असणाऱ्या एकत्रित वैविध्यतेचं मनापासून कौतुक वाटतं! १५ तारखेला देशभरात संक्रांत, पोंगल, बिहू हे सण तर साजरे झालेच पण भारतीय लष्कर दिनही उत्साहात पार पडला. १५ जानेवारी १९४९ या दिवसाला इतिहासात अतिशय महत्व आहे. या दिवशी फील्ड मार्शल के. एल. करिअप्पा यांनी लेफ्टनंट जनरल फ्रान्सिस बुचर यांच्याकडून भारतीय लष्कराचे पहिले प्रमुख म्हणून सूत्रे हाती घेतली होती. यास्तव १५ जानेवारी हा भारतीय लष्कर दिन म्हणून ओळखला जातो.

'सर्व्हिस बिफोर सेल्फ' हे ब्रीदवाक्य नसानसात भिनवत भारतीय लष्कर गेली ७१ वर्षे यशस्वीरित्या कार्यरत आहे. सीमेवरील सुरक्षा आणि शांतता अबाधित ठेवण्यासोबतच आपत्ती काळात नागरिकांच्या मदतीला धावून जाणाऱ्या लष्कराचा आपल्या सर्वांनाच सार्थ अभिमान वाटतो. सर्जिकल स्ट्राईक बद्दल बोलताना अंगावर सरसरून काटा येतो. जिद्द, चिकाटी आणि देशासाठी जीवाचीही पर्वा न करण्याची मनोवृत्ती असणारे लष्करातील योद्धे हेच खरंतर आपल्या रोजच्या शांत झोपेचे कारण असतात. अशातच जेव्हा एखाद्या महिलेचे नाव लष्करातील कामगिरीमुळे पुढे येते तेव्हा ऊर भरून आल्यावाचून राहत नाही.

भारतीय लष्करात पहिलं पाऊल ठेवलं ते अंजना भदौरिया व प्रिया झिंगन आणि त्यांच्यासारख्या २५ स्त्रियांनी! १९९२ मध्ये पहिली वहिली २५ स्त्रियांची तुकडी 'ऑफिसर्स ट्रेनिंग अकॅडमी' मध्ये दाखल झाली. मार्च १९९३ मध्ये या महिलांच्या तुकडीने भारतीय लष्करात पदार्पण केले आणि त्याकाळच्या सामाजिक विचारसरणीचा चेहरामोहराच बदलला. लष्करातील पहिले गोल्ड मेडल मिळवणारी स्त्री म्हणून अंजना भदौरिया हिचा उल्लेख केला जातो. १९९३ मध्येच लष्करात भरती झालेली अलका खुराना ही प्रजासत्ताक दिनाच्या संचलनात (रिपब्लिक डे परेडमध्ये) व लष्कर दिनाच्या संचालनात भाग घेणारी पहिली महिला ठरली. मेजर प्रिया झिंगन यांना सुरुवातीला पोलीस दलात भरती व्हायचे होते. पण १९९२ मध्ये त्यांना लष्करात भरती होण्यासाठी परवानगी मिळाली.

भारतीय लष्करातील महिलांबद्दल लिहिताना मिताली मधुमिता हे नाव घ्यावेच लागेल. २००० साली सैन्यात भरती झालेल्या मितालीने शौर्यपुरस्कार मिळवणारी पहिली भारतीय महिला बनून इतिहास रचला. २६ फेब्रुवारी २०१० मध्ये काबूल येथील भारतीय दूतावासावर झालेल्या दहशतवादी हल्ल्यावेळी अनन्यसाधारण शौर्य दाखवल्याबद्दल तिला २०११ मध्ये सेना मेडलने गौरविण्यात आले. तिने जवळ जवळ १९ लोकांना या हल्ल्यातून वाचवले होते.

# कंधोसे मिलते है कंधे...

२०११ मध्ये भरती झालेली शांती टिग्गा ही भारतीय लष्करातील पहिली महिला 'जवान' ठरली. तोपर्यंत महिलांना लष्करात लढाऊ पदांसाठी भरती करून घेत नव्हते. तिची खासियत म्हणजे तिला १.५ किलोमीटर शर्यतीत पुरुष प्रतिस्पर्ध्यांपेक्षा पाच सेकंद कमी लागली होती. शस्त्रास्त्रांवर विशेषतः बंदुकीवर प्रभुत्व असणाऱ्या शांतीचे प्रशिक्षकांकडून कौतुक होत असे. तिच्या या गुणांमुळे तिला नेमबाजीतील सर्वोच्च पद देण्यात आले. शांतीला सर्वोत्कृष्ट प्रशिक्षणार्थी म्हणूनही गौरविले होते.

२००६ मध्ये लष्करातील नायक अमित शर्मा याच्याशी लग्न झाले तेव्हा प्रिया सेमवाल हिने केवळ फर्स्ट इयर पर्यंतचेच शिक्षण घेतले होते. स्वतः फक्त दहावी पर्यंतचेच शिक्षण असूनही अमितने तिच्या शिक्षणाला खंबीर पाठींबा दिला. या जोरावर तिने एम. एस. सी. मॅथेमॅटीक्स पर्यंतचे शिक्षण पूर्ण केले. त्यांना ख्वाहीश नावाची मुलगी आहे. सगळं व्यवस्थित सुरू असताना अरुणाचल प्रदेशातील एका लष्करी कारवाईत अमित शर्मा शहीद झाले. त्यांच्या छोट्याश्या सुखी कुटुंबाला धक्का बसला. चार वर्षाच्या ख्वाहीशकडे बघत प्रिया स्वतःला सावरू लागली. अमित शर्मा ज्या तुकडीत होते त्याचे कमांडिंग ऑफिसर कर्नल अरुण अग्रवाल यांनी प्रियाच्या जोरकस शैक्षणिक पार्श्वभूमीमुळे लष्करात भरती व्हायचा सल्ला दिला आणि शक्य ती सगळी मदत तिला करत गेले. प्रियाच्या घरून साहजिकच सुरुवातीला विरोध झाला पण पतीच्या निधनानंतर, मनाने त्याच्या सर्वात जवळ पोहोचण्याचा हा एकच उपाय आहे हे ओळखून तिने हा धाडसी निर्णय घेतला होता. प्रियाने स्वतःच्या मुलीला आपल्या आईकडे ठेवून चेन्नईच्या ऑफिसर्स ट्रेनिंग अकॅडमी मधून खडतर प्रशिक्षण घेतले. पती नॉन कमिशन्ड ऑफिसर होते आणि प्रियाने कमिशन्ड ऑफिसर म्हणून भारतीय लष्करात पाऊल ठेवले. प्रियाच्या या धैर्याला सलाम करताना आपण एवढं सुखवस्तू आयुष्य जगतानासुद्धा किती तक्रारी करत असतो याचा राहून राहून विचार येतो. दुःख अगदी आभाळाएवढं असलं तरी त्यावर पाय ठेऊन खंबीरपणे उभं राहिल्यावर किती यश आणि समाधान मिळतं याचं मूर्तिमंत उदाहरण म्हणजे लेफ्टनंट प्रिया!




कॅप्टन दिव्या अजित कुमार ही 'आर्मी एअर डिफेन्स' म्हणजेच लष्करातील हवाईदलाच्या तुकडीत भरती झाली. तिला २०१५ मधील प्रजासत्ताक दिनाच्या परेड मध्ये पहिल्यांदाच भाग घेत असलेल्या संपूर्ण महिला तुकडीचे नेतृत्व करायचा बहुमान मिळाला. या तुकडीमध्ये १५४ महिला ऑफिसर्स आणि कॅडेट्स होत्या. या परेडला अमेरिकेचे माजी अध्यक्ष बराक ओबामा प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. दिव्या सध्या चेन्नईतील ऑफिसर्स ट्रेनिंग अकॅडमीमध्ये शिकवत असून विविध शाळा व कॉलेजेसमध्ये जाऊन लष्करातील करियरच्या संधींविषयी माहिती व प्रोत्साहन देते.

सुरक्षेसंबंधी संवेदनशील वातावरण असणाऱ्या नथुला पाससारख्या भारत-चीन बॉर्डरवर तैनात असणाऱ्या लष्करी तुकड्यांमध्ये कॅप्टन स्वाती सिंग ही एकमेव स्त्री आहे. एका नामांकित मल्टीनॅशनल कंपनीतील सुखवस्तू नोकरीची संधी सोडून या सॉफ्टवेअर इंजिनिअर स्वातीने लष्करातील नोकरीला क्षणार्धात प्राधान्य दिले, ज्याचा पश्चात्ताप तिला आजिबात होत नाही असेच ती सांगते.

एका स्वातंत्र्यसैनिकाची मुलगी म्हणून जन्माला आलेल्या डॉ. सीमा राव यांना 'इंडियाज् वंडर वुमन' म्हटले जाते. डॉ. सीमा राव या देशातील पहिल्या आणि एकमेव कमांडो ट्रेनर आहेत. त्या कमांडोंना प्रशिक्षण देतात. आत्तापर्यंत त्यांनी तब्बल २०,००० कमांडोंना प्रशिक्षण दिले आहे. हे प्रशिक्षण त्या पूर्णपणे मोफत देतात. त्यांनी मार्शल आर्ट मध्ये ब्लॅक बेल्ट मिळवला आहे. जगभरातील केवळ दहा महिलांना येणारा 'जीत कुने दो' हा मार्शल आर्टमधील अत्यंत अवघड प्रकार त्यांनी आत्मसात केला आहे. डॉ. सीमा यांचे वैशिष्ट्य असे की त्या तीस यार्डातील रेंजमध्ये कोणत्याही प्रकारच्या शत्रूवर अचूक निशाणा साधू शकतात.

यावर्षी झालेल्या 'आर्मी डे परेड' म्हणजेच लष्कर दिन संचालनाचे वैशिष्ट्य असे की या परेडमध्ये कॅप्टन तानिया शेरगिल या स्त्रीने एका संपूर्ण पुरुषांच्या तुकडीचे नेतृत्व केले.

या स्त्रियांच्या यशोगाथा बघताना आपण फुलाची पाकळी सुद्धा नाही याची सातत्याने जाणीव होत राहते. स्त्रियांना संधी मिळत नव्हत्या तेव्हापासून ते आत्ता संधीचं क्षितिज खुलं होईपर्यंत खडतर मार्गावरून प्रवास करत त्यांनी आपल्यासमोर प्रेरणादायी उदाहरणांचा डोंगरच उभा केला आहे. चाकोरीबद्ध करीअरच्या साच्यात न अडकता 'कंधो से मिलते है कंधे' याची प्रचिती पदोपदी येत आहे. त्यांच्या शौर्याला आणि धैर्याला बिइंग वुमनचा सलाम!

■ ■ ■



## कायद्याचं बोला...

अॅड. अभिश्री कुलकर्णी
response.beingwoman@gmail.com

काही महिन्यांपूर्वी सोशल मीडियावर #MeToo मोहीम गाजत होती. त्यातून हॉलीवूड, बॉलीवूड तसेच राजकीय, सामाजिक क्षेत्रातील अनेक महिलांनी उघडपणे स्वतःवर झालेला लैंगिक अत्याचार जगासमोर मांडला. या मोहिमेचे यश अपयश यावर बरीच टीका टिप्पणी झाली. पब्लिसिटी स्टंट म्हणून काही सेलिब्रिटी महिला या गोष्टी समाज माध्यमांचा गैरवापर करून पसरवत आहेत, असंही काहीजण म्हणाले. अर्थात या सगळया गोंधळात एक गोष्ट मात्र नक्की पुढे आली, ती म्हणजे या समस्येची व्याप्ती.

स्त्री शिकली, स्वतंत्र व्यक्ती म्हणून समाजात वावरू लागली. ग्लॅमरस जगात अभिनेत्री म्हणून प्रसिद्धी मिळवली. तरीही तिची असुरक्षितता तशीच आहे. खरंतर अजूनच वाढली आहे. दिवसातले ७-१० तास ऑफिसमध्ये घालवले जातात, अगदी सेकंड होम असल्यासारखे. पण हे सेकंड होम खरंच सुरक्षित आहे का? मी टू मोहिमेनंतर आपल्याला या प्रश्नाचं उत्तर नकारार्थीच मिळत आहे.

गेल्या दशकात महिला सक्षमीकरणासाठी केल्या गेलेल्या अनेक कायद्यांमध्ये महत्त्वाचा कायदा म्हणजे कामाच्या ठिकाणी होणाऱ्या लैंगिक अत्याचाराला प्रतिबंधक असणारा, २०१३ सालचा अधिनियम, POSH हे त्या कायद्याचं संक्षिप्त नाव. आजच्या लेखात आपण Protection of Women Against Sexual Harassment at Workplace म्हणजेच POSH बद्दल माहिती घेऊ.

टीना एका सॉफ्टवेअर कंपनीत डेव्हलपर म्हणून नुकतीच नोकरीला लागली होती. कॉलेजच्या कॅम्पस प्लेसमेंट मधून मिळालेली ही पहिलीच नोकरी. त्यामुळे नोकरी लागूनही कॉलेजचा मोकळेपणा तिच्या वागण्या-बोलण्यात अजूनही होता. आयटी कंपनीतल्या प्रोजेक्ट टाईमलाइन सांभाळताना बरेचदा ऑफिसमध्ये उशिरापर्यंत थांबणे होत असे. साहजिकच तिच्यासारखंच तिच्या टीम मधल्या अनेकांना थांबायला लागत असे. त्यातून तिची बऱ्याच जणांशी चांगली मैत्रीसुद्धा झाली होती. एकूणच सगळं बरं चाललेलं असताना तिच्या टीम मधल्या अजयचं वागणं तिला जरा खटकायला लागलं. उगीचच जवळ येऊन बसणं, ओझरते स्पर्श, आवर्जून तिला घरापर्यंत ड्रॉप करणं, रात्री उशिरापर्यंत व्हॉट्सअॅपवर चॅटिंग, उगीच तिच्या दिसण्याचं वागण्याचं अगदी कंटाळा येईपर्यंत वायफळ कौतुक करू लागला. टिना हळूहळू अजयला टाळू लागली. साध्या सरळ मैत्रीतही खटके उडू लागले. अजय अजूनच डॉमिनेट करू लागला. न रहावून अजयनं टीनाला सांगितलं की त्याच्या शारीरिक आकर्षणाला तिनं प्रतिसाद दिला नाही तर तिला तिच्या प्रोजेक्ट मधून काढायची 'व्यवस्था' करायला लागेल. कितीही मोकळी वागणारी असली तरी टीना या प्रकाराने अस्वस्थ झाली. पहिलीच नोकरी आणि त्यातून जर प्रोजेक्ट हातातून गेला तर करिअरवर किती परिणाम होईल याची तिला भीती वाटायला लागली. 'No Is No' हे या लोकांना कळत नाही का हा प्रश्न तिला भेडसावू लागला.

काही दिवस विचार केल्यावर मात्र टीनाने याबद्दल तिच्या सीनियरला, नीताला हा प्रकार सांगितला आणि पॉश या कायद्याची तिला ओळख झाली. थोडक्यात या कायद्यातील महत्त्वाच्या तरतुदी पुढीलप्रमाणे :

✻ दहा पेक्षा जास्त महिला कर्मचारी असणाऱ्या सर्व कार्यालये, ऑफिसेस, शासकीय संस्था, कॉलेज, शाळा सगळीकडे पॉश कमिटीची स्थापना करणे.
✻ पॉश कमिटीमध्ये ऑफिस बाहेरील एका सदस्याची नेमणूक करणे.
✻ लैंगिक छळ या व्याख्येत शारिरीक, मानसिक, शाब्दिक आणि ऑडिओ-व्हिज्युअल माध्यमांद्वारे केलेल्या लैंगिक त्रासाच्या सर्व कृती समाविष्ट आहेत.
✻ नोकरीमध्ये आमिष, बढती, पगारवाढ देण्यासाठी लैंगिक संबंधांची मागणी तसेच संबंधांना नकार दिल्यावर नोकरी, बढती पगारवाढ न देण्याच्या धमक्या या प्रकारांना 'लैंगिक छळ' या व्याख्येत प्रतिबंधित केले आहे.

# POSH




✻ सदर पॉश कायदा आणि त्यातील तरतुदींबद्दल ऑफिस मधील सर्व कर्मचाऱ्यांना प्रशिक्षण देणे अनिवार्य आहे.
✻ तक्रारदार महिलेला सर्व मदत व संरक्षण तसेच आरोपीवर कारवाईचे आदेश पॉश कमिटी देऊ शकते.
✻ याशिवाय खोट्या तक्रारी दाखल केल्यास अश्या महिलेवर कारवाईचे आदेश ही विशेष तरतूददेखील 'पॉश' द्वारे केली आहे.
✻ असंघटित क्षेत्रात काम करणाऱ्या महिलांसाठी जिल्हास्तरीय पॉश कमिटी सरकारने स्थापन केल्या आहेत.

हा कायदा लैंगिक छळाला प्रतिबंध करण्यासाठी सर्वसमावेशक आहे. परंतु यामध्ये महिलांनी जागरूक असणं आणि वेळ आल्यावर हिमतीने तक्रार करणं ही खूप महत्त्वाची गोष्ट आहे.

काही वर्षांपूर्वी आलेला अमिताभ बच्चन यांचा पिंक नावाचा सिनेमा आठवतोय? कुठल्याही स्त्रीला तिला नको असलेल्या माणसाच्या स्पर्शाला, लैंगिक कृतीला 'नाही' म्हणायचा आणि त्या 'नाही'वर ठाम राहण्याचा अधिकार आहे. असा अधिकार आहेच, आपल्या राज्यघटनेनेच आपल्याला तो दिला आहे. या मूलभूत अधिकाराची जाणीव आणि त्याबद्दलची स्त्रियांची आग्रही भूमिका मात्र आपल्यालाच निभावायला लागणार आहे. अत्याचार घडून गेल्यावर एक पीडित म्हणून MeToo म्हणत एकत्र येण्यापेक्षा We Too म्हणत एकत्र येत ठाम संदेश आजूबाजूच्या विकृत प्रवृत्तींना देऊया आणि लैंगिक छळ प्रतिबंधित करूया.

■



## हे चक्र असंच फिरत राहणार...

आता परत २६ जानेवारी येणार!
परत लोकांचा देशाभिमान जागृत होणार
परत सगळ्यांचे DP बदलणार
आणि Whats-app वर भलेमोठे मेसेजेस येणार!
देशाचा जाज्वल्य अभिमान असणार
त्या दिवशी सगळेच देशप्रेमी होणार
शाळेत जाऊन सगळे Selfies काढणार
आणि Feeling Patriotic असे स्टेटस टाकणार!
पांढऱ्याशुभ्र कपड्यांची खरेदी होणार
Show Off करण्यात रेलचेल असणार
कोण किती छान दिसते यावर यथेच्छ Comments होणार
यात झेंडावंदन कुठेतरी हरवून जाणार!
मी कसा Show Off करत नाही
याचा देखील Show Off होणार
आज मेरा भारत महान स्टेटस ठेवणारे
उद्या देशाचं अस्तित्वच विसरणार!
मोठी लोकं मोठ्या मोठ्या बढाया मारणार
आपण कसे देशासाठी काहीतरी केलं पाहिजे याची चर्चा होणार
जोरदार उपक्रम ठरणार
दुसऱ्या दिवशी हेच लोक फॉरेन कंपनीत नोकरीला जाणार!
याहीपलिकडची लोकं तर जोडून सुट्टी घेणार
घरच्यांना घेऊन मस्त एखादी ट्रिप मारून येणार
दुःख वगैरे तर सोडाच हो
पण झेंडावंदन न केल्याची यांना साधी खंतही नसणार!
दुसऱ्या दिवशी मात्र रस्त्यावर पडलेल्या झेंड्यांचे फोटो येणार
त्याबरोबर संतप्त प्रतिक्रियाही असणार
पण आम्हाला दिसलेले झेंडे
आम्ही खाली वाकून मात्र कधीच नाही उचलणार!
या साऱ्या जत्रेवर Objection तरी कोण घेणार
जो घेईल त्याला Typical ठरवलं जाणार
सध्याचे Trends फॉलो करता करता
देशाला मात्र कधीच विसरून जाणार!
मग परत १५ ऑगस्ट येणार
हे चक्र असंच फिरत राहणार
आणि देशाचे खरेखुरे रक्षक
असेच हळहळत राहणार
असेच हळहळत राहणार....!

**रश्मी पाटील, बावधन**

## वाचकांची पत्रे



Dear Editor,
At the outset, Congratulations on a quality fortnightly publication 'Being Woman'. Your tabloid is devoted to women but it showcases articles which can attract diverse readership. The articles featuring current issues, culture, fashion and lifestyle celebrate and relate to the experiences of women in all walks of life. I usually enjoy reading online edition and recently I had the opportunity to see the print paper copy during my visit to Pune. It is indeed an impressive start and I wish all the best to you and your team!
Best regards,
**Sachin Satpute**
**Chairman, Indian Chamber of Commerce in Korea (ICCK)**
**President, Novelis Asia-Pacific**

■ ■ ■

मी पहिल्या दिवसापासून being woman वाचतेय, आणि खूपच वेगवेगळ्या विषयांवर इथे लेख मांडले जातात. यावेळचा हेमांगी नवले यांचा अलक आणि परवीन तडवी यांचा गजापल्याड हे आर्टिकल खूप आवडले. थोडं वेगळं वाचायला मिळालं. राधिका यांचं संपादकीय दर अंकाला अजूनच अपेक्षा वाढवतंय. फोटोवरून वय लहान वाटतंय, पण अभ्यासपूर्ण लेख असतात. Keep it up.
मागच्या अंकातील स्मृती कुलकर्णी यांचा सेफ्टी फर्स्ट हा लेख म्हणजे वास्तवातल्या घटनांवरच केलेलं भाष्य आहे. सेल्फ डिफेन्स च्या चांगल्या टिप्स आहेत. वर्षा कदम यांचा द शॉप म्हणजे नवीन व्यवसाय करू इच्छिणाऱ्या महिलांसाठी स्टार्टअप प्लॅनच आहे. खूप बारीकसारीक गोष्टींचा विचार करुन लिहीले आहे.
बाकी सर्व टीमला शुभेच्छा! हा पेपर अजून वाढीस लागावा ही सदिच्छा!

**मानसी भालेराव,** नायजेरिया

■ ■ ■

यावेळीसचा नवीन वर्षातला being woman चा अंक ऑनलाईन हातात पडला. पडल्याबरोबर लागलीच वाचून काढला. सगळेच लेख खूप मस्त आहेत. मला विशेष करून पूजा देशपांडे यांचा इकिगाई हा लेख खूप आवडला. व्यवस्थित मांडणी, आणि वेगवेगळ्या विषयांवर लेखन यांचं खूप सुरेख संगम या पेपर मध्ये आहे. माझ्या कडून Being Woman ला खूप खूप शुभेच्छा. हा पेपर उत्तरोत्तर अजूनच वाचनीय आणि रंगतदार होईल यात शंका नाही.

**सौ. ज्योती विशाल गडलिंग,** रसेल स्ट्रीट, इंग्लंड.

# 'असाही एक अर्जुन'



सौ. वसुंधरा अर्जुनवाडकर
response.beingwoman@gmail.com

नेहमीप्रमाणे 'सांस्कृतिक भवन'चा हॉल पूर्णपणे भरला होता. स्वामीजींचा गीतेमधील कर्मयोग, ज्ञानयोग आणि भक्तियोग अतिशय सोप्या भाषेत विशद करून सांगण्यात हातखंडा होता आणि कलियुगामध्ये आपल्या जीवनात कर्मयोग कसा आचरणांत आणायचा हे ते सहजपणे सांगायचे. त्यामुळे त्यांच्या प्रवचनाला गर्दी होत असे. पण त्यामध्ये साधारणपणे साठीकडे झुकलेले किंबहुना साठी पार केलेल्या श्रोत्यांची संख्या जास्त असे. पण त्यांची नजर जेथे स्थिर होई ती व्यक्ती मात्र चाळीशीच्या आगे मागे असावी याचा त्याना अंदाज आला होता. म्हणूनच की काय त्यांचे त्या व्यक्तीबद्दलचे कुतुहल जागे झाले होते. ती व्यक्ती उच्चशिक्षित आहे आपल्या नोकरी व्यवसायात यशस्वी आहे, हे जाणवत होते. तरी त्या व्यक्तीच्या चेहऱ्यावर प्रसन्नता नव्हती. एक निर्विकारपणा, एक उदासीनता जाणवत होती. आणि म्हणूनच स्वामीजींनी मनाशी काही विचार केला होता. आज काही झाले तरी हया उदासिनतेच्या मागचे कारण जाणून घ्यावयाचे असे त्यांनी ठरविले.

प्रवचन संपल्यावर त्यांनी एका स्वयंसेवकांकडून त्या व्यक्तीला बोलावून घेतले. त्या व्यक्तीच्या चेहऱ्यावर एक संभ्रमीतता स्वामीजींना दिसली. स्वामीजींनी त्यांना जवळ बसवून घेतले आणि अत्यंत मृदु नजरेने त्यांच्याकडे पाहिले. साधारणपणे या वयाच्या व्यक्ती व्यवसायातील नोकरीतील नवी नवी आव्हाने स्वीकारण्यात आणि नवी उद्दीष्टे पार पाडण्यात गुंतलेली असतात. पण या व्यक्तीचं तसं दिसत नव्हतं. स्वामीजींना त्यांनी थोडं झुकून नमस्कार केला आणि प्रश्नार्थक चेहऱ्याने त्यांच्याकडे पाहिलं स्वामीजींनी विचारलं ''आपलं नांव?''

''मी डॉक्टर श्रीकांत जोशी, एका नामांकीत हॉस्पिटल मध्ये सर्जन आहे.''

''तरीही एवढया व्यापातून आपण माझे प्रवचन ऐकायला येता?'', स्वामीजींनी त्यांना प्रश्न केला. ''हो, मी आपल्या सहवासात राहीन म्हणतो'', डॉक्टर म्हणाले. स्वामीजी चकित झाले. पण काही बोलले नाहीत. डॉक्टरांना स्वामीजींनी तोंडभरून आशीर्वाद दिला. आपण या विषयावर उद्या बोललो तर चालेल का असं स्वामीजींनी विचारलं तर डॉक्टरांनी मान डोलावली.

दुसऱ्या दिवशी प्रवचन संपल्यावर डॉक्टर स्वतः स्वामीजींनी भेटायला आले. स्वामीजी म्हणाले, डॉक्टर आपण माझ्या बरोबर राहू इच्छिता याचं कारण? डॉक्टर गप्प बसले. स्वामीजींनी मग त्यांची कौटुंबिक चौकशी केली. त्यांना दोन मुले होती अत्यंत हुशार, पत्नी देखील एक बालरोग तज्ञ होती. सांपत्तिक परिस्थिती अत्यंत उत्तम. हे ऐकल्यावर स्वामीजींचा चेहरा प्रश्नार्थक झाला.

''डॉक्टर तुम्ही वेल सेटल्ड आहात. अजून तुमचं वय लहान आणि अशी निवृत्तीची भाषा का करता?'' डॉक्टर म्हणाले ''आजकाल प्रॅक्टिसमध्ये मन रमत नाही. काय होतंय, कुठं खुपतंय हे कळत नाही.'' स्वामीजी ते ऐकून गोंधळले. त्यांनी विचारलं, ''ही निवृत्ती घ्यावी असं तुम्हाला कधी पासून वाटू लागलं?'' डॉक्टर प्रथम गप्प बसले. पण नंतर मात्र ते बोलू लागले, अगदी एखादया रिळापासून दोरा सुटावा तसे.

डॉक्टर एक निष्णात सर्जन होते. एका बुध्दीमान संस्कृत शिक्षकाच्या पोटी त्यांचा जन्म झाला होता. बुध्दीमत्ता अनुवंशिक आली होती तसे त्यांच्यावर चांगले संस्कारही झाले होते. शाळेपासून मेरीट मध्ये येता येता ते मेडिकल व्यवसायात उतरले. स्वत:चा स्वतंत्र दवाखाना उघडण्यापेक्षा त्यांनी एका नामांकीत हॉस्पिटलमध्ये नोकरी करणे पसंत केले. पहिली कांही वर्षे ते खरोखरीच यात रमले पण एक दिवस एक घटना घडली. डॉक्टर कॉरिडॉर मधून जात असताना अचानक त्यांना त्यांची कामवाली दिसली. डॉक्टरांनी तिची विचारपूस केली. ती डॉक्टरांनाच शोधत होती. हातात दवाखान्याच्या बिलाचा कागद होता. डॉक्टरांनी चौकशी केली तेव्हा ती म्हणाली तिची ८ वर्षाची नात खेळता खेळता पडली होती हाताला फ्रॅक्चर झाले होते. आणि मुलीला ॲडमिट केले होते. ब्लड-युरीन तपासण्या केल्या, सलाईन लावले होते. शिवाय एक्सरे आणि प्लास्टरचे भरमसाठ बिल झाले होते आणि तिला ते बिल कमी करून हवे होते. डॉक्टर चकित झाले. फ्रॅक्चरमुळे एक्सरे आणि प्लास्टर समजू शकले पण ॲडमिट करून सलाईन लावणे ब्लड आणि युरीन तपासणे याची काही आवश्यकता नव्हती डॉक्टरांनी बिल घेतले मी बघतो म्हणाले आणि तिला डिस्चार्ज घेऊन घरी जायला सांगितले आणि मग हळूहळू त्या दवाखान्यातील गैरप्रकार त्यांच्या समोर येऊ लागले. पेशंटसकडून आकारला जाणारा भरमसाठ फी, अनावश्यक तपासण्या त्यांना पटेना व काही कारण नसताना अथवा जिथे औषधावर भागेल असे असताना ऑपेरेशनच कसे योग्य आहे हे पेंशटच्या गळी उतरवायचे, ठराविक कंपन्यांचीच औषधे पेशंटसना लिहून द्यायची ती औषधे सुध्दा हॉस्पिटलच्याच शॉप मधूनच घ्यायची हे त्यांच्या मनाला बोचू लागले संस्कारीत मनाला याचा त्रास होऊ लागला.

एकदा तर एका पेशंटच्या बाबतीत हद्दच झाली पेशंटचा मृत्यू झाल्यावर तसे घोषीत न करता त्याला व्हेंटिलेटवर दोन दिवस ठेवले डॉक्टर प्रथम अचंबित आणि नंतर उद्विग्न झाले पेशंटची आर्थिक परिस्थिती लक्षात घेऊन गरज नसेल तर ऑपरेशन ते टाळू लागले. आपल्या मित्रांबरोबर त्यांनी याविषयी चर्चा केली पण त्या मित्रांनी आपली हतबलता व्यक्त केली. शेवटी आपणही डॉक्टर होण्यासाठी भरमसाठ पैसे खर्च केलेतच की याची जाणीव त्यांनी करून दिली. पण डॉक्टराना ते पटले नाही.

अशातच अचानकपणे त्यांनी स्वामीजींचे एक व्याख्यान ऐकले आणि ते स्वामीजींकडे ओढले गेले. त्यांची सद्सद्विवेक बुध्दी त्यांना चैन पडू देईना. घरची सांपत्तिक परिस्थिती उत्तम आहे, मग आपण या न पटणाऱ्या गोष्टींना का साथ द्यायची? केवळ आपण हा व्यवसाय स्विकारला म्हणून? मग डॉक्टर ही पदवी घेऊन कॉलेजच्या बाहेर पडताना घेतलेल्या शपथेच काय? आपल्या सामाजिक कर्तव्याचं काय? केवळ पैसा मिळतो म्हणून या आपल्या मनावरचा ताण किती वाढवायचा? त्यापेक्षा निवृत्ती घेऊन अध्यात्माकडे वळावं असं त्यांना वाटू लागलं होत. म्हणून तर ते स्वामीजींच्या प्रवचनाला हजर राहू लागले. हे सर्व सांगून डॉक्टर गप्प बसले. स्वामीजींनी मृदु भाषेत त्यांना विचारले ''डॉक्टर माझी प्रवचनं तुम्ही नीट ऐकलीत ना? अहो त्यात ज्ञानयोगाबरोबर कर्मयोगही मी सांगितला आहे. ऐन युद्धाच्या प्रसंगी अर्जुनाने शस्त्रे खाली ठेवली. केवळ राज्य संपादन करण्यासाठी आपले बंधू, गुरु, मित्र यांना मारायचे हे अर्जुनाला पटले नाही. मग अर्जुनात आणि तुमच्यात काय फरक उरला? पण अर्जुन योद्धा होता, चुकीच्या आणि वाईट गोष्टी थांबविण्यासाठी त्याला त्याच्या प्रियजनांबरोबर लढणे भागच होते. सत्याच्या मार्गाने जाण्यासाठी त्याला युध्द करावेच लागणार होते. कृष्णानेसुध्दा म्हणूनच अर्जुनाची साथ केली. अधर्माच्या विरोधात उभे राहणे, लढणे हे आवश्यक आहे, यासाठी रणांगणावर त्याने गीतेचा भावार्थ सांगितला. आता तुम्ही असा विचार करा की अर्जुनाच्या ठिकाणी तुम्ही उभे आहात आणि कौरवांच्या ठिकाणी तुमच्या हॉस्पिटलमधील मॅनेजमेंट आहे. आता तुम्ही कसे वागाल?''

डॉक्टर क्षणभर गप्प बसले. त्यांनी थोडा विचार केला. म्हणजे स्वामीजी मी या सगळ्यांच्या विरोधात जाऊ? स्वामीजी म्हणाले, ''हे बघा डॉक्टर, प्रथम तुम्ही स्वत:ला या मानसिकतेमधून बाहेर काढा की, मी हतबल आहे, माझा नाईलाज आहे आणि नंतर, तुमच्याकडे येणाऱ्या पेशंटसना तुम्ही त्यांच्या नकळत विश्वास द्या की, तुम्ही त्यांना योग्य ती ट्रीटमेंट द्याल. हळूहळू तुमचा आत्मविश्वास वाढेल. आज आलेली उदासीनता कमी होईल. एक प्रकारे तुम्ही पुन्हा या व्यवसायात रमाल. तुमच्या बद्दलच पेशंटसच मत बदलेल ते जाहीरपणे तुमचं कौतुक करतील. आणि तीच तुमच्या कामाची पावती असेल. सध्या तरी तुम्ही इतकंच करा, पुढचं आपण नंतर बघू.''

स्वामीजींना माहित होत पुढं कसं वागायचं हे डॉक्टरांना सांगायची गरज भासणार नाही. ते स्वतःच मार्ग काढतील आणि तसंच झालं!

काही महिन्यानंतर डॉक्टरांनी त्यांना सांगायला सुरूवात केली. डॉक्टरांनी आपल्या वागण्यात बदल केला तसे पेशंटस त्यांच्याकडे ट्रीटमेंट घेण्याचा आग्रह धरू लागले. हळूहळू ही गोष्ट त्यांच्या सहकारी डॉक्टरांच्या लक्षात आली. त्यांनी विचारताच डॉक्टरांनी त्यांचं मत सांगितलं, त्यामागचं कारण सांगितलं. इतर कसेही वागोत पण आपण मात्र मेडीकल कॉलेजमधील घेतलेल्या शपथेला जागायचं, गरज असेल तरच इतर तपासण्या सांगायच्या. शेवटी पेशंटस बरे होणे हे महत्वाचे हे त्यांनी इतरांना पटवून दिले. १००% नाही पण ६०%-७०% होणाऱ्या चुकीच्या गोष्टींना आळा बसला. त्यांनी स्वामीजींचे आभार मानले. स्वामीजींनी त्यांना मनापासून आशीर्वाद दिला. ■


## शैशव



शुक् शुक् कुणी केलं
म्हणून मागे वळून पाहिलं
माझं बालपण
बोलवत होतं मला!
अरे, असं कसं अचानक
मी आश्चर्यानं विचारलं
ज्याला इतकं मागं टाकलं
ते समोर उभं ठाकलं!
माझं बालपण
बावळट किती होतं
रिबिन बांधलेल्या दोन वेण्या
आणि फ्रॉकमध्ये आलं होतं!
मला खुपलं,
त्याचं माझ्या स्मार्ट रूपाशी विसंगत
असणं;
आणि उगाचच,
मला खुणावत त्याचं बोलवत राहणं!
ए तू जा परत
येईल कुणीतरी
फोन करूनच ये
पुन्हा केव्हातरी!
ओळखीचे धागे सारे
उसवून टाकले
मागे वळून न पाहता
घराकडे वळले!
तेव्हापासून बालपणानं
माझ्याकडे पाठ फिरवली,
सारंकाही मिळालं
पण निरागसताच हरवली!

**स्मिता टाकवेकर**

# कणाकणांतून...





जयश्री खाडीलकर
response.beingwoman@gmail.com

आपल्या बऱ्याच जणांना मधमाशांबद्दल जेवढी माहिती असायला हवी तेवढी नाही. म्हणूनच त्याबद्दल काही माहिती देण्याचा हा प्रयत्न. मध म्हणलं की तो मधमाशीमुळेच मिळाला आहे हे ओघाने आलेच आणि मधमाशी तो कुठल्यातरी फुलावरूनच आणत असणार हे पक्के लक्षात ठेवायला हवे. हे सांगण्याचं कारण असं की जेव्हा कुणाला सांगितलं जातं की हा सूर्यफुलाचा मध आहे, हा बाभळीचा मध आहे, हा ओव्याचा मध आहे; तेव्हा त्यांच्या मनात असंख्य प्रश्न निर्माण होतात व विविध प्रतिक्रिया मिळतात. जसे की, ओव्याच्या मधात ओव्याचा इसेन्स असतो का, बाभळीच्या झाडाला पोवळे लागते त्यातून बाभळीचा मध बनतो का, असा वेगवेगळ्या प्रकारचा मध असतो हे पहिल्यांदाच कळलं बुवा! यात फक्त एकाच जातीचा मध कसा काय येतो; दुसरा त्यात कसा काय मिसळला जात नाही, वगैरे वगैरे! परंतु जे मधाचे नाव सांगितले जाते ते कुठून आणि कसे येते ते लक्षात घेऊया.

मधमाशीचे मुख्य काम परागीकरण आहे हे आपण लक्षात घेतले पाहिजे. हे काम करत असताना मधमाशा फुलांमधील पुष्परस आणि परागकण गोळा करतात. मधमाशांचे प्रमुख अन्नच मुळी पुष्परस, परागकण आणि पाणी असे आहे. परागीकरणासाठी मधमाशांच्या पेट्या वेगवेगळ्या शेताजवळ किंवा शेतात, शेतातील धान्य, फुलावर आल्यावर ठेवल्या जातात. बहुधा शेताच्या आजूबाजूच्या परिसरात त्याच धान्याची किंवा तेलबियांची प्रचंड प्रमाणात लागवड झालेली असते. जसे की, सूर्यफूल. सोलापूर जिल्हा असो वा अकोला त्यावेळी त्या परिसरामध्ये फक्त सूर्यफूलच उपलब्ध असते. कपाशी, ज्यूट, तूर, उडीद, मूग वगैरे सारखी दुसरी पिकं जरी असली तरी त्यावर मधमाशा काम करत नाहीत. निसर्गाने प्रत्येकाचे काम नेमून दिले असल्याने प्रत्येक मधमाशी प्रत्येक अस्तित्वात असलेल्या फुलावर बसून मध गोळा करीत नाही. काही फुलांचे परागीकरण हे भुंगे अत्यंत उत्तम प्रकारे करतात त्या फुलांवर मधमाशा क्वचितच आकर्षित होऊन काम करतात. त्याचीही अनेक कारणे आहेत; त्यातील एक कारण म्हणजे माशीच्या सोंडेचा आकार हा फुलाच्या स्त्रीबीजाच्या नलिकेपेक्षा लहान आणि लांबी जास्त असायला हवी तरंच त्या पुष्परस ओढून घेऊ शकतात.

मूळ मुद्दा असा आहे की परागीकरणासाठी ज्या पिकांची निवड आपण करतो त्याचा पुष्परस आणि परागकण मधमाशांना अतिशय प्रिय असतात आणि म्हणूनच त्या पिकाच्या परागीकरणासाठी महत्वाची भूमिका बजावतात. म्हणजेच जेंव्हा बाभळीची झाडे फुलावर येतात तेंव्हा किंवा सूर्यफूल फुलावर येते तेंव्हा; मधमाशा बाभळीचाच पुष्परस किंवा सूर्यफुलाचाच जास्तीत जास्त पुष्परस गोळा करतात. मधमाशांच्या संपूर्ण अंगावर अगणित केस असतात आणि त्याद्वारे अनेक परागकण त्यांच्या अंगाला चिकटलेले असतात. त्या जेंव्हा स्त्री बीजावर गुंजन करतात तेंव्हा स्त्रीबीजातून अधिक पुष्परस स्त्रवू लागतो व तो घेण्यासाठी मधमाशी स्त्रीबीजावर बसते; ह्यावेळी माशीच्या अंगावरील परागकण स्त्रीबीजावर पडतात व परागीकरण होते. आता असा अनेक फुलांवरचा पुष्परस शोषून घेऊन ती पोळ्यात परत येते व विशिष्ट षट्कोनात पुष्परस जमा करते. ह्यावेळी तिच्या अंगावरील परागकणदेखील पुष्परसात मिसळले जातात. हे परागकण पुष्परसाचे मधात रूपांतर झाल्यावरही कायम राहतात व तेच मधाची चव, रंग आणि घनता ठरवण्यास कारणीभूत असतात.

आणखीन एक समजून घेण्याचा मुद्दा असा की वेगवेगळ्या चवीचे मध हे वेगवेगळ्या प्रदेशात वेगवेगळ्या वेळी फुलावर येतात. त्यामुळे वेगळ्या चवीचे मध एकत्र येत नाहीत. ह्याला एकच चव अपवाद आहे व ती म्हणजे विविध फुले किंवा मल्टीफ्लोरा. ही फुले विविध परिसरातील विविध जातीचे गवत, आपल्याला कल्पनाही करता येणार नाही अशा त्या परिसरातील अनेक विविध झाडांवरील फुलांवर मूळ हंगामाआधी किंवा नंतर उगवतात व मधमाशा त्यातील पुष्परस गोळा करतात.

**- क्रमशः**

# प्रवास स्व-शोधाचा



प्रियांका शेजाळे
response.beingwoman@gmail.com

*भाग : ४*

कोणत्याही राज्याची संस्कृती म्हणजे तिथली माणसं अशी संस्कृतीची साधी व्याख्या करायची ठरवली तर ओडीसा हे राज्य सांस्कृतिकदृष्ट्या सर्वात श्रीमंत राज्य ठरेल. रोजच्या साध्या जगण्यातून आदर्शाचा वस्तुपाठ घालून देणारी ही माणसं कुठल्याही पर्यटकाला भुरळ पाडतील अशीच आहेत. अगदी नवजात बालकापासून ते बुजुर्ग व्यक्तीपर्यंत सगळेच आपापलं वैशिष्ट्य टिकवून आहेत. ओडीसा हे आर्थिकदृष्ट्या मुळात गरीब राज्य. त्यात कालाहंडी भाग म्हणजे दारिद्र्याची परिसीमा. त्यामुळे साहाजिकच, भव्य- दिव्य, डोळे दिपवून टाकणारं असं इथे काही सापडणार नाही. मात्र, निसर्गाची असीम कृपादृष्टी या संपूर्ण भागावर आहे. लांबच लांब पसरलेल्या डोंगररांगा, ऋतूमानानुसार प्रसन्न दिसणारा भवताल, खळाळणारे ओढे आणि सर्वात जास्त लांबीचा असणारा पुरी चा विशालसमुद्र हे निसर्गाचं वरदान मात्र इथल्या माणसांनी दोन्ही करांनी स्वीकारलंय आणि प्राणापलीकडे जपलंय.

रोजच्या दोन वेळच्या अन्नाची भ्रांत असलेलं इथलं जनजीवन समजून घेताना मला कधीच त्यांच्याविषयी कणव वाटली नाही. उलट, प्राप्त परिस्थितीत अजिबात न डगमगता आर्थिक, सामाजिक, कौटुंबिक समस्यांवर तोडगा काढत आपला जीवनप्रवास करणाऱ्या सगळ्या लढवय्यांच्या जगण्याविषयी आदर वाटत आला आहे. आयुष्याकडून कोणतीही अपेक्षा न ठेवता जगत राहाणाऱ्या इथल्या लोकांच्या चेहऱ्यावरचं हसू कधीचं मावळत नाही. संपूर्ण मानवजातीविषयी त्यांच्या मनात असलेली अपार करुणा त्यांच्या प्रत्येक कृतीतून मला दिसत राहिली.

घनदाट अरण्य प्रदेश असलेल्या कालाहंडी भागात मलेरियाचं प्रमाण प्रचंड आहे. परंतु, डास चावल्याने आपल्याला ताप येतो आणि त्यावर तातडीने उपचार घेतले नाहीत तर हाच ताप जीवघेणा ठरू शकतो हे त्यांच्या गावीही नाही. म्हणूनच, आम्ही गावा-गावांत पथनाट्य, गीत गायन किंवा मलेरिया संदर्भात चित्रप्रदर्शन करून जनजागृती करण्याचा प्रयत्न करत असू. दूरदर्शन, रेडिओ किंवा पुस्तके यांसारखं कुठलंही माध्यम उपलब्ध नसलेल्या कालाहंडीच्या ७५ गावांमध्ये या प्रकारच्या कार्यक्रमांनी ग्रामस्थांचं मनोरंजन व्हावं हादेखील त्यामागचा एक हेतू असे. गावातली मातीची कौलारू स्वच्छ घरं आणि त्यात आपुलकीने आदरातिथ्य करणारी माणसं माझ्या कायम लक्षात राहिली आहेत. पैशानं फार श्रीमंत नसली तरी इथली माणसं आल्या- गेल्या पाहुण्यांचं आदरातिथ्य मात्र अगदी प्रेमानं आणि न कंटाळता करतात. सगळ्या दुभत्या जनावरांच्या दुधावर केवळ त्यांच्या पिलांचा हक्क असतो असं मानणाऱ्या ग्रामस्थांच्या घरात दूध नावालाही दिसत नाही त्यामुळे कोरा चहा व पांढरा भात सोबत चिंचा, बोरं, चुलीच्या निखाऱ्यावर भाजलेले बटाटे असा साधा पण रुचकर पाहुणचार आम्ही अनेकदा घेतला.

कालाहंडी हा भाग सर्वच बाबतीत मागासलेला असल्याने तान्ह्या बाळापासून ते नव्वदी पार केलेल्या बुजुर्ग व्यक्तीपर्यंत सर्वांच्याच अंगावर अगदी अंग झाकण्यापुरते मोजके कपडे दिसतात. इथे पुरुष एखादा शर्ट किंवा सदरा आणि लुंगी असा पोशाख करतात तर अगदी १५ वर्षांच्या मुलींपासून ते म्हाताऱ्या आजीपर्यंत सगळ्या स्त्रिया शक्यतो साडीच नेसतात. साडीवर चोळी घालायची गरज आजच्या तरुण मुलींना वाटत असलेली दिसते, पण पूर्वीच्या बायका मात्र चोळी विरहीत साडी नेसतात. चोळी न घातल्याने अंतर्वस्त्र घालण्याचा प्रश्नच उद्भवत नाही. अर्थातच बऱ्याच बुजुर्ग आज्या फक्त पदर घट्ट बांधून उघड्या स्तनांनी फिरताना दिसतात. विशेष म्हणजे अशा प्रकारचा पोशाख असूनही इथल्या स्त्रिया ओंगळवाण्या दिसत नाहीत आणि त्यांच्या शरीराच्या उघड्या भागाकडे गावातला कुठलाही पुरुष वासनेच्या नजरेने बघत नाही. हे चित्र बहुतांश आदिवासी भागात दिसतंच, कदाचित त्याचमुळे आदिवासी भागात स्त्रियांवर होणाऱ्या बलात्काराचं प्रमाण नगण्य आहे.

आर्थिक सुबत्ता नसलेल्या या भागात स्त्री हा अर्थव्यवस्थेचा केंद्रबिंदू आहे. घरातली, शेतातली, रस्ता बांधणीची अशी सगळी कामं इथे स्त्रियाच करतात. कुटुंबाला आर्थिकदृष्ट्या सक्षम करण्याची देखील जास्तीत जास्त जबाबदारी स्त्रीचीच. त्यामुळे, इथले पुरुष दिवसाच्या कुठल्याही प्रहरात घराबाहेरच्या सोप्यावर, गावच्या पारावर एकत्र बसून बिड्या ओढत गप्पा मारताना दिसतात. याउलट, स्त्री मात्र घरात भात शिजवून, मुलांना खाऊ घालून पहाटेच घराच्या बाहेर पडते. ताप-सर्दी-खोकला यासारखं साधं आजारपण, मासिक पाळी सारखं सृजनाचं दुखणं किंवा नवनिर्मितीची क्षमता असलेलं गरोदरपण असं कुठलंच शारीरिक दुखणं स्त्रीच्या कामाच्या आड येत नाही. याच कारणासाठी, ओडीसा जिल्ह्यात मुलगी झाली की लोकांना प्रचंड आनंद होतो. संपूर्ण भाग कष्टकरी लोकांचा असल्याने इथल्या स्त्रियांमध्ये दागिन्यांची हौस फारशी आढळत नाही. सोनं विकत घेणं तर आर्थिकदृष्ट्या अशक्यच आहे, चांदीचे दागिने मात्र काही स्त्रिया- मुलींच्या अंगावर दिसतात. चांदीची नाजूक माळ घातलेल्या तरुण मुली असोत की नुकतेच कान आणि नाक टोचलेली अगदी लहान मुलगी असो. चांदीचे दागिने यांच्या अंगावर अतिशय शोभून दिसतात.

मासिक पाळी सुरु झाल्यावर तातडीने झालेलं लग्न, अवघ्या सोळाव्या वर्षी आलेलं गरोदरपण, दररोज करावी लागणारी कष्टाची कामं, मासिक पाळी व गर्भावस्थेत न घेतली जाणारी आवश्यक काळजी आणि शरीराला मिळणारं अपुरं पोषण यामुळे स्त्रियांमध्ये कुपोषण, रक्तदोष आणि इतर शारीरिक समस्यांचं प्रमाण भरपूर आहे. म्हणूनच स्त्रियांच्या आरोग्याकडे विशेष लक्ष देणे ही स्वास्थ्य स्वराज या आमच्या संस्थेच्या अजेंड्यावर असणारी महत्त्वाची बाब आहे. एकीकडे स्त्रीची प्रचंडप्रमाणात होणारी फरपट आणि दुसरीकडे 'रजोपरबो' सारखा खास स्त्रीयांभोवती फिरणारा सण हे अजब रसायन इथे पाहायला मिळालं.

परबो या शब्दाचा अर्थ पर्व असा होतो. रजोपरबो म्हणजे रजोगुणाचा सोहळा. मासिक पाळी आलेल्या सगळ्या कुमारिका मुलींच्या अस्तित्वाचा हा सोहळा आहे. ओडीसात साधारण जून महिन्याच्या सुरुवातीला ४ दिवस हा सण साजरा केला जातो. या काळात वयात आलेल्या सगळ्या मुलींना, स्त्रियांना आराम दिला जातो. त्यांच्याकडून कोणतंही काम करून घेतलं जात नाही, त्यांच्या आवडीचे गोडाचे पदार्थ करून त्यांना आपुलकीने खाऊ घातले जातात. एकूणच स्त्रीकेंद्रित असलेला हा सण अनुभवताना मला फार गंमत वाटली.

ही माणसं कुणाचाही मत्सर करत नाहीत, भावकीतली जमिनीसंदर्भातले हेवेदावे आणि घरातल्या छोट्या कुरबुरी सोडल्या तर पोलीस यंत्रणा, न्यायव्यवस्था यांनी हस्तक्षेप करावा असे मोठे तंटे इथे दिसत नाहीत. इथल्या माणसांच्या जगण्यात एक कोरेपणा आहे. त्यांचं पारदर्शी आणि नितळ आयुष्य आपल्यातल्या माणूसपणाला साद घालत राहातं. त्याला प्रतिक्षिप्त क्रियेसारखा आपसूक आणि शुद्ध प्रतिसाद देता आला की आपण निव्वळ माणूस म्हणून जगत आहोत याची खात्री पटत राहाते. **-क्रमशः**

RNI TC No. MAHMAR49779

# १०२ वर्षांची तरुणी

सौ. जान्हवी गणपुले, रत्नागिरी
response.beingwoman@gmail.com



'सूर्यनमस्कार' हा भारतीय जीवनशैलीतील एक अतिशय सहज सोपा पण खूप काही फायदे मिळवून देणारा व्यायामप्रकार! त्याचा अवलंब करण्याचे आपण फक्त मनातल्या मनात ठरवतो. त्यासाठी अनेक मुहूर्त शोधतो. मात्र सूर्यनमस्कार घालण्याचं व्रत अंगी बाणवण्याचं महत्कार्य केलं आहे, रत्नागिरी जवळील कोळंबे या छोट्याशा खेड्यातील लक्ष्मी भास्कर दामले म्हणजेच सर्वपरिचित 'दामले आजी' यांनी!

वयाच्या १४ व्या वर्षी कोळंबे येथील भास्कर दामले यांच्याशी विवाह होऊन घरात आली द्वारकाताई उर्फ लक्ष्मी भास्कर दामले. त्यांचे यजमान मुंबई येथील सरदारगृहात भोजन करण्याच्या कामावर रुजू होते. उत्तर आयुष्यात रत्नागिरी येथील दत्तमंदिर कार्यालयात याच व्यवस्थेत ते रुजू झाले. उद्योग-व्यवसायाच्या निमित्ताने ते घरापासून लांब असायचे. त्यामुळे घरचे सर्व व्यवहार सांभाळण्याची जबाबदारी दामले मावशींवर आली. मावशींचे शिक्षण ७ वी पर्यंत झाले आहे. त्याआधारे घराशेजारी असलेली शेतजमीन, पाटावरच्या पाण्यावर अवलंबून असणारी बागायती, घरचे व्यवहार, पै-पाहुणा या सगळ्या गोष्टीं मावशींनी चोखपणे, हसतमुखाने पार पाडल्या.


खेडेगावातील जगण्याचा एक अविभाज्य आणि अपरिहार्य भाग म्हणजे सरपटणाऱ्या प्राण्यांचं वावरणं! अशा सरपटणाऱ्या प्राण्यांच्या बंदोबस्ताचं काम दामले मावशी सहजतेने करत. मावशींच्या खंबीर आणि कणखर वृत्तीमुळेच त्यांनी कुळांकडे अडकलेल्या दामले कुळाच्या जमिनी कोणावर कसलाही अन्याय न करता सोडवून घेतल्या.

मावशींचा आहार अतिशय नियंत्रित आहे. त्यामुळे आजार त्यांच्यापासून चार हात लांबच असतात. शिवाय त्यांना ठाऊक असलेल्या घरगुती औषधांचा वापर करून स्वतःला व आसपासच्या रुग्णांना आराम पडावा म्हणून मावशी नेहमीच तत्पर असतात. आपण सर्वांना अवघड व कठीण वाटणारी गोष्ट म्हणजे कांदा-लसूण या पदार्थांवरील निर्बंध! पण दामले मावशींनी या दोन गोष्टी नेहमीच वर्ज्य केल्या. त्यांच्या शारीरिक व मानसिक खंबीरतेचं कदाचित तेच गमक असेल. या सर्व जीवनशैलीसाठी, शरीरस्वास्थ्यासाठी, मानसिक आरोग्यासाठी दामले मावशींनी 'सूर्यनमस्कार' या व्यायामप्रकारावर भर दिला. यासाठीचा नियमितपणा कौतुकास्पद आहे.

१ जानेवारी २०२० या दिवशी दामले मावशींनी वयाची १०२ वर्षे पूर्ण केली. मावशी अजूनही रोज न चुकता-चुकवता किमान १२ सूर्यनमस्कार घालतात. सूर्यनमस्कार त्यांनी आपल्या जगण्याचा अविभाज्य घटक मानला आणि त्याचाच अवलंब करीत त्या वयाच्या १०२ व्या वर्षीही कणखर नि खंबीरपणे स्वावलंबी जीवन जगताहेत. कोणावरही विसंबून न राहता एकटीने प्रवासही करतात. या वयात मावशींची समरणशक्ती वाखाणण्यासारखी आहे. ४ वर्षांपूर्वी त्यांची आणि माझी सुमारे २० वर्षांनी भेट झाली, तेव्हाही त्यांनी मला नावासकट, नात्यासकट ओळखलं. म्हणूनच त्यांना दामले आजी ऐवजी मावशीच म्हणावसं वाटतं.

आपल्याला या वयात, वार्धक्यात असं जगणं म्हणजे एखादी कविकल्पना वाटेल, पण मावशींचं ते नियमित जगणं आहे. या वयातही नियमितपणे 'सूर्यनमस्कार' घालून आपल्यापुढे आदर्श ठेवलेल्या दामले मावशींना शतशः प्रणाम! ■





## कविता अनुवाद व रसग्रहण

# Ballad of the Landlord



अपर्णा महाजन
response.beingwoman@gmail.com

१९३० च्या सुमारास, अमेरिकेत जेव्हा कृष्णवर्णीय आणि गौरवर्णीय वर्णभेद निकराला जाऊन पोहोचला, तेव्हा हार्लेम मध्ये एक क्रांती घडली. आफ्रिकेचे कृष्णवर्णीय लोक बेधडकपणे आपले म्हणणे वेगवेगळ्या कलामाध्यमांतून व्यक्त करू लागले. लँगस्टन ह्यूज या आफ्रिकन-अमेरीकन कवीने केलेली Ballad of The Landlord ही कविता, वर्णभेदाचा आणि त्यानुसार होणाऱ्या सामाजिक अन्यायकारक आणि अमानुष वागणुकीचे वर्णन करते. कवितेतील शब्द जितका आशय पोहोचवतात, त्यापेक्षा अधिक कवितेतील न दिसणारे शब्द अर्थगर्भ आहेत. अक्षरांचे बदललेले आकार आणि शैली जणू काळ्या गोऱ्या भेदाचं प्रतिनिधित्व करतात.

मालक मालक
माझ्या घराचं छप्पर गळतंय
गेल्या आठवड्यात बोललो होतो
बघा काही आठवतंय?
मालक मालक
मोडका तोडका झालाय जिना
पायऱ्या चढून येताना तुम्ही
पडले कसे नाहीत हेच कळेना
काय म्हणालात?
मी तुम्हाला देणं लागतो दहा रुपयांचं?
दहा रुपये शिल्लक आहेत द्यायचे असंच म्हणालात ना?
मी अजून जास्तीचे दहा रुपये भरीन
पण तुम्ही घराची डागडुजी तर करा ना!
काय?
घर रिकामं करून माझी हकालपट्टी करायला सांगताय?
माझी वीज तोडून टाकताय?
माझं सामानसुमान रस्त्यावर टाकून द्यायचं म्हणताय?
ओह,
फारच चढ्या आवाजात बोलताय हां!
बोला बोला, काढा जेवढी भडास काढायची,
दिली ठेऊन एक कानफटीत तर
ताकद नाही राहणार अवाक्षरही बोलायची!
*पोलीस, पोलीस*
*घ्या घ्या या माणसाला*
*ताबडतोब ताब्यात घ्या*
*सरकारी आदेशांना धारेवर धरून*
*बघा हडपतोय माझी जागा...*
हवालदाराची शिट्टी, गस्तीची घंटा,
अटक!
प्रीससिंक्ट पोलीस चौकी,
गजाआडची खोली!
पेपरमधली ठळक बातमी,
'एका फाटक्या माणसाने घरमालकास धमकावले, भाडेकरूचा जामीन अर्ज फेटाळला!
न्यायाधीश महाशयांनी त्या निग्रोला नव्वद दिवसांचा तुरुंगवास फर्मावला!'

ही कविता बॅलड या प्रकारात मोडते. म्हणजे शौर्याचे वर्णन असणारी कविता. मराठीत जसा पोवाडा असतो तसाच. आफ्रिकन परंपरेतून आलेलं ब्लूज प्रकारचं संगीत आहे ज्यामध्ये साद प्रतिसाद असतो, रचनेची पुनरुक्ती असते. या कवितेत जोपर्यंत आफ्रिकन भाडेकरू बोलतोय तोपर्यंत ब्लूज सारखा ठेका आहे. हे संभाषण आहे पण ते आपल्याला एकतर्फी वाटते. या कवितेत तो आफ्रिकन भाडेकरू आपल्या भाड्याच्या घराची व्यथा त्याच्या अमेरिकन घरमालकाला सांगतो आहे.

पहिल्या कडव्यात त्याची अजिजी, त्याची अगतिकता जाणवते. नंतर घराच्या मोडतोडीचं वर्णन करताना, कळकळीने सांगतो आहे. कविता वाचतानाच शब्दातून आर्जव जाणवतं. हळूहळू त्याची जागा संताप घेतं. त्याच्या 'काय' या प्रश्नातून व पुढील कडव्यातून घरमालकाचे अव्यक्त शब्द ऐकू येतात आणि त्याच्या आवाजात दाबून ठेवलेला संताप व्यक्त होतो व सारा नूरच बदलतो.

गोऱ्या पोलिसांना दिलेला हुकूम, चोराच्या उलट्या बोंबा ठोकणारा घरमालक, गोऱ्या न्यायाधीशांनी दिलेला 'न्याय'. एकाक्षरी शब्दातून व्यक्त होणारी वर्चस्वाची भावना या साऱ्याचा शेवट म्हणजे बिचाऱ्या कृष्णवर्णीयाला मिळालेला तुरुंगवास. गोऱ्या लोकांच्या राज्यात गोऱ्यांचंच वृत्तपत्र. त्यातली भाषापण गोरेपणाचा दिमाख दाखवणारी. मोठ्या, ठळक लिपीत लिहिलेली बातमी दहशत दाखवणारी. सुरुवातीला घर दुरुस्त होत नसल्याची दिरंगाई आणि त्याच्या विरोधात त्याच्या मार्मिक संतापाला शिक्षा देण्याची एकाक्षरातून दिसणारी घाई. तरीदेखील कवीने उपहासाने या कवितेला 'शौर्यगीत' म्हटले आहे. शौर्य कर्म कोणाचे? एका अमेरिकन गौरवर्णीयाला 'फार बोललास तर कानफटीत देईन असे म्हणणाऱ्या कृष्णवर्णीयाचे की त्याच्या धमकीने पोलिसांची, कोर्टाची, वृत्तपत्रांची अशी 'भारदस्त आपल्यांची' खमकी मदत घेऊन एका गरिबाला चेचून टाकणाऱ्या घरमालकाचे? ■

# सखासोबती निवडताना



वर्षा कदम
response.beingwoman@gmail.com

नमस्कार मैत्रिणींनो! आज आपण गप्पा मारणार आहोत, तुमचा आमचा सर्वांचा लाडका सखा, मोबाईलविषयी!

तुम्ही म्हणाल त्यात काय एवढं? आता तर एक वर्षाच्या मुलालाही आई म्हणण्याआधी मोबाईल म्हणता यायला लागलं आहे! अगदी खरं, पण याबाबतीत काही नव्याने विचार करावा असं वाटलं आणि आपली आई-आजी यांनाही मोबाईल सहजगत्या वापरता यावा म्हणून हा लेखन प्रपंच!

प्रथम तर नवीन मोबाईल विकत घेताना प्राधान्य कशाला द्यावे हे ठरवले पाहिजे. माझ्या मैत्रिणीकडे तो आहे, म्हणून मीही घेते, असा विचार करू नये. आपण या इलेक्ट्रॉनिक उपकरणाचा वापर कसा आणि किती कामांसाठी करणार आहोत हे आधी ठरवावे. कारण पूर्वीसारखा तो फक्त कॉलिंगसाठी लागणारा फोन न राहता स्मार्टफोन झालेला आहे.

तर मोबाईल विकत घेताना महागडा मोबाईल घ्यायचा म्हणजे चांगले फीचर्स मिळतात असं अजिबातच नाही. तुमचा वापर कसा आहे त्यावर मॉडेल ठरवावं, म्हणजे असं की सतत प्रवासाचे काम असणार आहे आणि बॅटरी चार्ज करायला जागा नाही त्यांनी जास्त बॅटरी बॅकअपवाले आणि पटकन बॅटरी न उतरणारे मोबाईल घ्यावेत. ज्यांचा वापर करणं रफ टफ आहे त्यांनी टिकाऊ आणि मजबूत मोबाईल बॉडीला प्राधान्य द्यावे. सध्या काही लोकं स्टेटस सिम्बॉल म्हणूनही याचा वापर करतात, त्यावेळेस ब्रँड महत्वाचा ठरतो. काहींना मोबाईलवर गाणी ऐकण्याची खूप आवड असते, अशांनी चांगल्या साऊंड क्वालिटीचे, लाऊड आवाजाचे फीचर्स असलेले घ्यावेत. सध्या सेल्फीने तर अक्षरशः सर्वांना वेड लावले आहे. त्यांच्यासाठी फ्रंट कॅमेरा किती मेगा पिक्सेलचा आहे हे पाहणं महत्वाचं ठरत. काहींना त्यावर व्हिडिओ नि सिनेमा बघायची आवड असते, अशा व्यक्तींनी मोठ्या स्क्रीनचे मोबाईल घ्यावेत. हे साधारण आडाखे आहेत, पण शेवटी आपल्याला आवडेल तो नि खिशाला परवडेल असा हा लाडका मोबाईल घ्यावा. कितीही पारखून घेतला तरी किमान ३-४ वर्ष नीट वापरला तर तो टिकू शकतो आणि यातल्या टेकनॉलॉजी दिवसागणिक बदलत असतात. त्यामुळे तो अपडेटेड ठेवावाच लागतो किंवा नवीन घ्यावा लागतो.

आता मनासारखा मोबाईल घेतला, त्याच्या पुढे काय करावं तर सर्वप्रथम कॉन्टॅक्ट लिस्ट भरावी. सध्या आपण पूर्णपणे मोबाईलमधल्या नंबर्सवरच अवलंबून असतो, असं मात्र करू नये. किमान ४ तातडीचे आणि जवळचे नंबर्स तोंडपाठ असावेत आणि आपल्या जवळच्या डायरीत नोंद केलेले असावेत. कारण बहुतेक मोबाईलना सध्या अनलॉक सिस्टिम असते. त्यामुळे इमर्जन्सीमध्ये दुसऱ्या व्यक्तीला आपली ओळख लागत नाही किंवा संपर्क होत नाही.

मोबाईल म्हणजे ॲपचं घर असं म्हणायला हरकत नाही. पहिले वॉट्सअप, ज्याने मेसेज तर्फे आपण इतरांच्या संपर्कात राहू शकतो, त्यानंतर युट्युब, यामुळे हवी ती माहिती, करमणूक आपण विडिओच्या साहाय्याने पाहू शकतो. फेसबुक, ट्विटर, इंस्टाग्राम यासारखी ॲप आपल्याला सोशल राहायला मदत करतात. टू डू लिस्ट ॲप, ज्यामुळे रोजच्या कामाची यादी सकाळीच बनवून ठेवली म्हणजे त्यातून आपली कामे वेळेवर आणि व्यवस्थित व्हायला मदत होते. पेमेंटशी संबंधित ॲप जसे की paytm, मोबिक्विक, भीम यामुळे घरबसल्या आपण सगळ्या प्रकारची बिले भरू शकतो. फक्त यासाठी सुरुवातीला माहितगार व्यक्तीकडून याच्या वापराविषयी सविस्तर माहित करुन घ्यावे. वयस्कर व्यक्तींना याचा नक्कीच फायदा होतो.



शिवाय स्त्रियांसाठी खूपच उपयुक्त असे ॲप सध्या उपलब्ध असतात. जसं की मिल प्लॅनर ॲप, डाएट फॉलो ॲप, हेल्थ विषयक ॲप, मंथली डेट रेकॉर्ड, सौन्दर्यविषयक, रोजचा जमाखर्च लिहता येईल अशी बरीच ॲप उपलब्ध आहेत.

यामध्ये डायरी असंही एक ॲप आहे. म्हणजे आपली रोजची दैनंदिनी आपण त्यात लिहून ठेवू शकतो, जेणेकरून दर वर्षाची वेगळी डायरी बाळगण्याची गरज नाही आणि त्याला अनलॉक करण्याची सुविधा असल्याने कुणी चोरून वाचेल याचीही भीती नाही.

मराठी लोकांसाठी यात मराठी कॅलेंडर ही डाउनलोड करू शकतो, त्यातही महत्वाच्या नोंदी करता येतात. याशिवाय यामध्येच गुगलही आपोआप येतंच, तो तर अलिबाबाचा अनंत माहितीचा खजिनाच म्हणावा लागेल. जिथे हवे ते शब्द टाईप केल्यावर आपल्याला त्याविषयी सगळी माहिती, फोटो मिळू शकतात.

आपल्याला अनोळखी पण इच्छित स्थळी जायचे असेल तर जीपीएस सिग्नल द्वारे आपण गूगल मॅप्सच्या आधारे रस्ताही शोधू शकतो.

आता असा सगळा जामानिमा करुन झाला, की हा मोबाईल हळूहळू मेसेजेस, फोटोज्, व्हिडीओज् यांनी रोजच्या रोज भरायला सुरुवात होते आणि सणासुदीला तर पूरच येतो शुभेच्छांचा! आमच्या शेजारच्या काकूंचीच मोठी पंचाईत झाली यामुळे! कोणताही नवीन फोटो त्यांना काढता येईना, कारण स्टोरेज फुल असा मेसेज सारखा यायला लागला. त्यांनी नवीन मोबाईल घ्यायचा ठरवला कारण हा मोबाईल भरला, यावर मी हसावं की रडावं मला कळेना. तर यावर एक उपाय असा करता येईल कि जसं आपण घराच्या साप्ताहिक स्वछतेसाठी वेळ देतो तसाचं एक दिवस मोबाईल स्वछतेसाठीही ठरवला पाहिजे. त्यातील अनावश्यक ते फोटो आणि मेसेज डिलिट करावेत. त्यामुळे स्टोरेज कॅपॅसिटी चांगली राहून मोबाईल फास्ट वापरता येतो आणि यातला डेटा आपल्याला कॉर्डद्वारे पीसी किंवा लॅपटॉपमध्येही सेव्ह करून ठेवता येतो. या उपकरणाची आतून जशी स्वछता होते तशी बाहेरूनही किमान साप्ताहिक स्वच्छता करावी. जसे की कव्हर काढून सॅनिटायझरने पुसून घेता येईल, कॅमेरालेन्स स्वच्छ कराव्यात, कारण हा आपण सतत जवळ बाळगून असतो, त्यामुळे जशी टीव्ही, लॅपटॉप यांची काळजी घेतो तशीच याचीही घेतली पाहिजे.

शेवटी जाता जाता एक महत्वाचे सांगावेसे वाटते. सध्या मोबाईल हा आपल्या आयुष्याचा एक अविभाज्य भाग बनला आहे, पण आपल्या सोयीसाठी मोबाईल आहे, मोबाईलसाठी आपण नाही हे लक्षात घेतलं पाहिजे. जसा बायका मंगळवारी, शुक्रवारी उपवास करतात तसाच उपवास मोबाईल किंवा सोशल मीडियाचाही करून बघा, एक प्रयोग म्हणून किंवा गंमत म्हणून, तुमचाच फरक तुम्हाला नक्कीच जाणवेल. नवीन वर्षाचं रेझोल्युशन म्हणूनही ठरवू शकता.

परंतु, एक कळकळीची विनंती, शक्यतो लहान मुलांना यापासून जास्तीत जास्त दूर ठेवता आलं पाहिजे, ते कसं करता येईल याबाबत पुढे कधीतरी आपण नक्कीच गप्पा मारुयात! सध्या साठी एवढंच! ■







'बीइंग वुमन' हे पाक्षिक मालक, प्रकाशक व मुद्रक रोहिणी अरुण वांजपे यांनी शैलेश आर्ट प्रिंट, १३६, नारायण पेठ, पुणे ४११०३० येथे छापून १, वाल्मिकी सोसायटी, पटवर्धन बाग, पुणे ४११००४, येथून प्रसीध्द केले. संपादक – राधिका गिरीश परांजपे
'Being Woman' fortnightly publication is owned, printed and published by Rohini Arun Wanjpe, printed at Shailesh Art Print, 136, Narayan Peth, Pune 411030 and published at 1, Valmiki Society, Patwardhan Baug, Erandawane, Pune 411004. Editor - Radhika Girish Paranjape